# संशोधकाचे मनोगत

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत महात्मा ज्योतीराव फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक, कृतिशील कार्याचा, चळवळीचा प्रभाव आहे. तेव्हा अशा चळवळीवर संशोधन करावे असा विचार मी ज्येष्ठ प्राध्यापक आणि स्नेही डॉ. संजय गायकवाड यांच्याकडे माझ्या अशा संशोधनाबद्दल विचार बोलून दाखविला आणि त्यांनी तात्काळ मला मार्गदर्शन करण्याचे मान्य केले. डॉ. गायकवाड हे स्वत: पुरोगामी अशा सत्यशोधक चळवळीतील अभ्यासक आणि कार्यकर्ते असल्याने आणि मी स्वत:ही 'अखिल भारतीय सत्यशोधक चळवळीचे' पुनरुज्जीवन करणारे आमदार श्री. रायभान जाधव यांच्या सान्निध्यात असल्याने मी 'सत्यशोधक चळवळीवरच' अभ्यास करावा असे ठरविले, आणि विद्यापीठामध्ये पीएच.डी.साठी नोंदणी केली. पण पुढे माझ्या काही कौटुंबिक आणि व्यावसायिक अडीअडचणींमुळे मला हे काम बरीच वर्षे करता आले नाही. पण पुढे अखिल भारतीय सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष मा. श्री. ॲड. वसंतराव फाळके पाटील, सातारा यांच्यासोबत या संघटनेमध्ये गेल्या दहा – बारा वर्षांपासून काम करण्याची संधी मला मिळाली आणि त्यामुळे 'सत्यशोधक समाज' या विषयावरील आपले संशोधन पूर्ण झाले पाहिजे असे मला वाटू लागले आणि आता हे संशोधन कार्य पूर्ण होत आहे याचा मला आनंद होत आहे.

माझे मार्गदर्शक डॉ. संजय गायकवाड यांचे तर मी विशेष आभार मानले पाहिजेत. कारण मी हे संशोधन पूर्ण करावे म्हणून नोंदणी केल्यानंतर इतका प्रदीर्घ काळ गेल्यानंतरही त्यांनी आपल्या जेष्ठ बंधुवत मार्गदर्शनाचे पाठबळ सतत माझ्या पाठीशी ठेवले. मला या कार्यात कधीही निराश होऊ दिले नाही. म्हणून तर हा संशोधन प्रकल्प पूर्ण होऊ शकला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे मला प्रारंभीपासूनच अतिशय मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभलेले आहे. याच विभागातून मी १९८० मध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. त्या काळातील माझे गुरुवर्य डॉ. जी.एन. शर्मा, डॉ. मोईन शाकीर, डॉ.ज.रा. शिंदे, डॉ. अर्जुनराव दर्शनकार, डॉ. पारस बोरा, डॉ. गणी, डॉ. अंकुश सावंत, डॉ. सुनिल दाते यांचे मोलाचे मार्गदर्शन मला मिळाले. १९८१-८३ मध्ये मी या विभागातून संशोधक छात्र म्हणूनही डॉ. मोईन शाकीर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य केलेले होते. त्यानंतरच्या काळातील प्राध्यापक वृंदानीही मला नेहमीच मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य केलेले आहे. विद्यमान विभागप्रमुख डॉ. मोहंमद उमर, डॉ. बी. एस. वाघमारे, डॉ. एस. एस. निकम, डॉ. पी. एस. अमृतकर आणि डॉ. के. एस. शाकीर या सर्वांचा मी आभारी आहे.

या संशोधन कार्यासाठी मला नेहमीच अनेक मान्यवर व्यक्तींनी प्रोत्साहन दिले. रेंगाळत पडलेल्या कामाबद्दल विचारणा केली. त्यात प्रामुख्याने माजी मुख्यमंत्री डॉ. शिवाजीराव पाटील, निलंगेकर, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. विठ्ठलराव लहाने, सरचिटणीस मा.श्री. मधुकरराव मुळे, उपाध्यक्ष मा. श्री. पद्माकरराव मुळे, प्राचार्य रा. रं. बोराडे, श्री. ॲड. वसंतराव फाळके पाटील, श्री. के. ई. हरिदास, डॉ. एस. ए. सोमवंशी, प्रा. बा. ह. कल्याणकर, डॉ. श्रीराम गुंदेकर, डॉ. सोमनाथ रोडे, डॉ. नागोराव कुंभार, प्राचार्य आर. टी. देशमुख, प्रा. आर. डी. नाईक आणि डॉ. सुधीर गव्हाणे या मान्यवरांसोबत आमचे प्राचार्य डॉ. पी. व्ही. जबदे, माझे मित्र प्राचार्य डॉ. अशोक वाकोडकर, प्राचार्य डॉ. वसंत सानप, प्राचार्य डॉ. व्ही. एल. एरंडे, प्रा. जी. ए. उगले, डॉ. एम.एन. सरनाईक, प्रा.शांताताई भोसले/गायकवाड, डॉ. श्रीराम जाधव, प्रा. बसवराज कोरे, डॉ. रावसाहेब ढवळे, डॉ. देवकर्ण मदन, डॉ. अशोक तेजनकर, डॉ. उत्तम पांचाळ,

डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. डी. बी. धायगुडे, डॉ. सूकुमार भंडारी, प्रा. रमेश बजाज, डॉ. विद्यासागर पाटंगणकर, डॉ. संभाजी वारुंगळे-पाटील, डॉ. सुखदेव पोटदुखे, डॉ. वंदना माहुरे, डॉ. रवि चव्हाण अशा अनेक मित्रांच्या आग्रहामुळे मी माझ्या थांबलेल्या संशोधन कार्याकडे पुन्हा वळू शकलो.

माझे सहकारी मित्र आणि आजच्या तरुण पिढीतील समाजशास्त्राचे एक अभ्यासू संशोधक - लेखक डॉ. दिलीप खैरनार यांच्या सूचना आणि सहकार्य विशेष मोलाचे ठरले. माझे सासरे शिक्षणाधिकारी श्री. आर. बी. डावकरे यांनीही मी माझे संशोधन कार्य पूर्ण करावे म्हणून सतत पाठपुरावा केला हे मी आर्वजून नमूद करू इच्छितो.

अनेक ग्रंथालयांमधून या संशोधनासंदर्भात अभ्यास केला. त्यात प्रामुख्याने आमच्या देवगिरी महाविद्यालयाचे ग्रंथालय, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे ग्रंथालय औरंगाबाद, मुंबई विद्यापीठ ग्रंथालय, मुंबई, विधान भवन ग्रंथालय, मुंबई, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, फर्ग्युसन महाविद्यालय ग्रंथालय, पुणे, अशा अनेक ग्रंथालयांचा हा अभ्यास पूर्ण करताना मोलाची मदत झाली म्हणून संबंधीत ग्रंथालयांचा आणि तेथील कर्मचाऱ्यांचा मी आभारी आहे.

काही महनीय व्यक्तींसोबत झालेली चर्चा आणि त्यांचे मार्गदर्शन अतिशय मोलाचे ठरलेले आहे. ज्यात डॉ. य. दि. फडके, डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. बाबा आढाव, डॉ. भा. ल. भोळे, प्राचार्य गजमल माळी, डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. जनार्दन वाघमारे, प्रा. हरी नरके, प्रा. भास्कर चंदनशिव, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. एस. एस. भोसले, ॲड. वसंतराव फाळके पाटील इत्यादी मान्यवरांचेही मी आभार मानू इच्छितो. कारण त्यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाने मला विश्लेषणपूर्ण आणि अत्यंत महत्त्वाच्या माहितीसोबत एक नवी प्रेरणा व ऊर्जा मिळत गेली.

प्रस्तुत संशोधन कार्य व्हावे म्हणून माझी आई श्रीमती द्वारकाबाई, माझी पत्नी सौ. मंगला नाईकवाडे, माझी मुले चि. ज्ञानेश, कु. शुभांगी आणि चि. सुशिल यानांही औत्सुक्य वाटत असे व त्यांचाही तगादा माझ्या पाठीमागे होता. माझ्या वडिलांचे निधन होऊन दहा वर्षे होत आहेत. या क्षणी त्यांच्याही आठवणी येतात आणि मन दु:खी होते, त्यांनी फार फार कठीण आर्थिक परिस्थितीत दिवस काढले व मला शिक्षणाची दारे उघडी केली, ते आज असते तर? पण त्यांचे आशीर्वाद आहेतच.

एकूणच माझा बराचसा मित्र परिवार मला नेहमीच माझ्या संशोधनाबद्दल एका आत्मीयतेच्या भावनेने सतत विचारत असे. यातूनच प्रेरणा घेऊन हे संशोधन कार्य आता सर्वांचे सहकार्य आणि सदिच्छांमुळे पूर्ण होत आहे, म्हणून यासाठी मला ज्यांचे ज्यांचे प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहकार्य मिळाले त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

या प्रबंध लेखनाचे डी. टी. पी. चे काम श्री. नितीन महिंद्रकर, श्री. संतोष पवार यांनी अतिशय सुबक आणि अल्पावधीत पूर्ण करुन दिले व शुद्धलेखन तपासून देण्याचे काम श्री. प्रकाश तत्सत यांनी करुन दिले त्यांचाही मी आभारी आहे. पुन्हा एकदा सर्वांचे आभार मानतो.

**दि. ११ एप्रिल २०११**

**महात्मा फुले जयंती** **प्रा. अशोक भा. नाईकवाडे**

‘अखिल भारतीय सत्यशोधक समाज’ या संघटनेचे संस्थापक
थोर क्रांतीकारक आणि समाज सुधारक महात्मा जोतिराव फुले
आणि
त्यांना साथ देणाऱ्या त्यांच्या पत्नी क्रांतीदेवी सावित्रीबाई फुले



**‘समाज सुधारणेचे क्रांतिकारी कृतिशिल फुले दाम्पत्य’**